# आत्मनिर्भर तेसाठीची वाटचाल

## स्वाध्याय

### परिच्छेद १


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४५ वरील (ओळ १ ते १२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|'बालपणीचा काळ सुखाचा' ......................

...................... अनाथ म्हणून दाखल झालो.|

## अ. आकलन

### कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तरः १. लेखिका- आठ-नऊ वर्षांची

२. लहान भाऊ- पाच-साडेपाच वर्षांचा

३. सर्वांत लहान भाऊ- अडीच-तीन वर्षांचा

### कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तरः १. अन्न २. अंगभर वस्त्र

३. नीट निवारा ४. सुख

## कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.

लेखिकेच्या वडिलांच्या क्षणिक रागाचा दुष्परिणाम

↓

१

↓

२

उत्तर: १. सुखी-समाधानी संसार क्षणात उद्ध्वस्त झाला.

२. लेखिका व भावंडं निराधार होऊन दुसऱ्यांच्या दारी आश्रित झाली.

## कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. उच्चारताना रम्य वाटणारे वाक्य →

२. लेखिका व भावंडे अनाथ म्हणून येथे दाखल झाली →

उत्तर: १. 'बालपणीचा काळ सुखाचा'

२. समाजकल्याण खात्याच्या रिमांड - होममध्ये

## कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. अशी निष्पाप अनाथ बालके ठिकठिकाणच्या ______

अ. शाळांमधून शिकत असताना दिसतात.

ब. रस्त्यांवर रडत बसलेली दिसतात.

क. अनाथाश्रमांतून लाखोंच्या संख्येने दैन्यवाणे जीवन जगत आहेत.

ड. अनाथाश्रमांमध्ये दाखल झालेली असतात.

२. त्या गेलेल्या छोट्यापेक्षा ______

अ. आणखी दोन मोठे होते.

ब. आणखी एक लहान होता.

क. मोठा भाऊ चांगला होता.

ड. प्रेमळ एकही भाऊ नव्हता.

**उत्तर:** १. अशी निष्पाप अनाथ बालके ठिकठिकाणच्या **अनाथाश्रमांतून लाखोंच्या संख्येने दैन्यवाणे जीवन जगत आहेत.**

२. त्या गेलेल्या छोट्यापेक्षा **आणखी दोन मोठे होते**.

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. अनाथ बालकांचे आयुष्य फार सुखाचे असते.

२. लेखिकेचे सर्वांत लहान भावंडं अन्नपाण्याशिवाय तडफडून वारले होते.

३. वडिलांच्या क्षणिक रागामुळे लेखिका वयाच्या आठव्या-नवव्या वर्षीच निराधार, आश्रित झाली.

४. लेखिका समाजकल्याण खात्याच्या रिमांड होममध्ये अनाथ म्हणून दाखल झाली.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य

३. सत्य ४. सत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'कुपोषण' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'अन्नपाणी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. दारिद्र्यात जन्मलेली बालके कशाने मरतात?

२. लेखिकेचं लहान भावंडं कशाविना तडफडून गेलं?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. लहान : मोठा : : अनाथ : [ ]

२. मृत्यू : जन्म : : श्रीमंती : [ ]

**उत्तर:** १. सनाथ २. दारिद्र्य

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. अन्नासाठी हात पसरावे लागण्याची दशा : [ ]

२. कमी अथवा निकृष्ट दर्जाचे अन्न सेवन करणे : [ ]

**उत्तर:** १. अन्नान्न २. कुपोषण

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

निराधार, बालपण, पोरके, अनाथ

**उत्तर:** बालपण

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

१. अन्नान्न दशा होणे :

अ. अन्न खाणे.

ब. अन्न वाया जाणे.

क. उपासमारीची पाळी येणे.

ड. व्रत असणे.

२. आश्रित होणे :

अ. दुसऱ्यांवर अवलंबून राहणे.

ब. दुसऱ्यांचा सांभाळ करणे.

क. दुसऱ्यांना आश्रय देणे.

ड. दुसऱ्यांसाठी आदर्श होणे.

**उत्तर:** १. उपासमारीची पाळी येणे.

२. दुसऱ्यांवर अवलंबून राहणे.

**कृ.५. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

**समाजकल्याण**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

**उत्तर:** समाज, कल्याण, कण, माज, कस, जमा, सज, सण, मास

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**

**जबाबदार**

| जबाब | जाब | बाब | दार | दाब | जर |
|---|---|---|---|---|---|

**उत्तर:** जाब

**कृ.७. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पुढे दिलेल्या शब्दकोड्यातून शोधा.**

१. आई
२. वडील
३. दारिद्र्य
४. मोठा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स | क | ल | पि | ता |
| मा | ता | थो | डा | क |
| ज | ब | र | बा | द |
| शा | दा | ला | ल | र |
| स्त्र | र | ग | रि | बी |

**उत्तर:**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स | क | ल | पि | ता |
| मा | ता | थो | डा | क |
| ज | ब | र | बा | द |
| शा | दा | ला | ल | र |
| स्त्र | र | ग | रि | बी |

**कृ.८. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

परिस्थिती कितीही बिकट असली, तरी ______.

**उत्तर:** १. परिस्थिती कितीही बिकट असली, तरी **जिद्दीने त्यावर मात मिळवता येते.**

२. परिस्थिती कितीही बिकट असली, तरी **आपण हार मानता कामा नये.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.**

(बालपण, दैन्यवाणे, झाला, मी, आम्ही, नऊ, पाहिलं)

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| बालपण, आयुष्य | मी, आम्ही | दैन्यवाणे, नऊ | झाला, पाहिलं |

**कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | वाटयाला | अ. | सप्तमी |
| २. | सुखाचा | ब. | चतुर्थी |
| ३. | समाधानात | क. | तृतीया |
| ४. | संख्येने | ड. | षष्ठी |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ ), (४ - क)

कृ.३. खालील अव्यये आणि अव्यय प्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | अव्यय | | अव्यय प्रकार |
|---|---|---|---|
| १. | पेक्षा | अ. | क्रियाविशेषण अव्यय |
| २. | पुढे | ब. | उभयान्वयी अव्यय |
| ३. | म्हणजे | क. | शब्दयोगी अव्यय |

उत्तर: (१ - क), (२ - अ), (३ - ब)

कृ.४. खाली एका सामासिक शब्दाचा विग्रह करून देण्यात आलेला आहे. तसाच दुसरा सामासिक शब्द परिच्छेदातून शोधा व त्याचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.

उदा. दुर्बुद्धी – दु: (वाईट) अशी बुद्धी

उत्तर:

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| कुपोषण | कु (वाईट) असे पोषण | कर्मधारय समास |

**कृ.५. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**

१. 'बालपणीचा काळ सुखाचा' हे वाक्य उच्चारताना किती रम्य वाटते नाही...!

**उत्तर:** उद्‌गारार्थी वाक्य

२. असं सुखाचं आयुष्य किती जणांना मिळतं?

**उत्तर:** प्रश्नार्थी वाक्य

३. अंगभर वस्त्र नाही, की नीट निवारा नाही.

**उत्तर:** नकारार्थी वाक्य

**कृ.६. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. कारणीभूत | कारनीभूत | कारणीभुत | कारणिभूत

२. असाहय | असहाय | असाह्य | असाय्य

**उत्तर:** १. कारणीभूत २. असहाय

**कृ.७. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. पण इतकं रम्य सहजपणाचं आयुष्य किती जणांच्या वाट्याला असतं

**उत्तर:** पण इतकं रम्य, सहजपणाचं आयुष्य किती जणांच्या वाट्याला असतं?

२. बालपणीचा काळ सुखाचा हे वाक्य उच्चारताना किती रम्य वाटते नाही

**उत्तर:** 'बालपणीचा काळ सुखाचा' हे वाक्य उच्चारताना किती रम्य वाटते नाही!

**ड. माझे मत**

**क्र.१. तुम्हाला तुमच्या आईवडिलांपासून दूर राहावे लागले आहे का? प्रसंगाचे वर्णन करा.**

**उत्तर:** आठव्या इयत्तेनंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत माझ्या आईबाबांनी मला विवेकानंद केंद्राच्या एका १५ दिवसांच्या शिबिरासाठी पाठवले होते. इतक्या जास्त दिवसांसाठी आईबाबांशिवाय एकटा असा मी फारच क्वचित बाहेर गेलो असेन. त्यामुळे तिथे जातानाच माझ्या मनाला हुरहूर लागली होती. शिबिराचे नियमही चांगलेच कडक होते. स्वतःचे कपडे स्वतःच धुणे, सकाळी अगदी लवकर उठणे, नाश्ता-जेवण यासाठी वेळेत पोहोचणे, स्वतःचे ताट-वाटी धुवून ठेवणे, स्वतःचे अंथरूण घालणे-आवरणे यांसारखी कामे करताना मला सारखे आईचे लाड आठवायचे. शिबीर घेणारे शिक्षक शिस्त लावतानाही आमच्यावर लक्ष ठेवून होते व काही दुखले खुपले तर काळजीही घेत होते; पण त्याला आईबाबांच्या मायेची सर कशी येणार? शिबीर संपताना नवा अनुभव, नवे मित्र, शिबिरात शिकलेले अनेक कलागुण यांनी शिदोरी भरली; पण त्याचबरोबर आईबाबांशिवाय राहणे किती अवघड आहे याची जाणीव झाली.

## परिच्छेद २

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४५ वरील (ओळ १२ ते २०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|तीन वेगळ्या ठिकाणी ......................

...................... एकेक वर्ग पुढे जात होतो.|

### अ. आकलन

कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.

लेखिकेने वर्णिलेले एकमेकांबरोबरच्या पोस्टकार्ड भेटीचे स्वरूप

↓

१

↓

२

↓

३

↓

४

उत्तर: १. पाच पैशांच्या पोस्टकार्डावरून लेखी भेट.

२. महिन्यातून एकदा.

३. कार्ड सेन्सार होऊन यायचे व जायचे.

४. एकमेकांची खुशाली व प्रगती कळे.

कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.

१

४ ← बोर्डिंगमध्ये लेखिकेची अन्नासाठी होणारी आबाळ → २

३

उत्तर: १. मोजून मापून अन्न मिळायचं.

२. वय वाढल्यावर ते कमी पडू लागलं.

३. भूक न भागल्यामुळे पोटात आगडोंब होई.

४. उपाशीतापाशी अर्धपोटी राहावे लागे.

कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.

पोटात आगडोंब झाल्यावर लेखिका हे उपाय योजत असे

१ २

उत्तर: १. कोठीघरातून गूळ - शेंगदाणे खाणे.

२. स्वयंपाक्याचा डोळा चुकवून ५ - १० चपात्या घेऊन खाणे.

कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. बोर्डिंगमधले नियम असे होते → ☐

२. या गोष्टीची जिद्द लेखिकेला स्वस्थ बसू देत नव्हती → ☐

उत्तर: १. जाचक २. शिकण्याची

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. पाच पैशांच्या पोस्टकार्डावरून फक्त आम्ही भेटत होतो; ________

अ. महिन्यातून फक्त एकदा!

ब. प्रत्यक्ष भेट शक्यच झाली नाही.

क. समोरासमोर भेटायला परवानगी नव्हती.

ड. प्रत्यक्ष भेटायची इच्छा नव्हती.

२. असेच उपाशीतापाशी अर्धपोटी ________

अ. झोपत होतो.

ब. आपापल्या ठिकाणी आम्ही वाढत होतो.

क. अभ्यास करत होतो.

ड. दिवस ढकलत होतो.

उत्तर: १. पाच पैशांच्या पोस्टकार्डावरून फक्त आम्ही भेटत होतो; **महिन्यातून फक्त एकदा!**

२. असेच उपाशीतापाशी अर्धपोटी **आपापल्या ठिकाणी आम्ही वाढत होतो.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखिका व तिची भावंडे तीन वेगवेगळ्या गावी, वेगळ्या अनाथाश्रमात वाढली.

२. पाच पैशांची मनीऑर्डर पाठवून लेखिका तिच्या भावंडांच्या गरजा भागवायची.

३. वय वाढू लागल्यावर बोर्डिंगमध्ये ठरावीक मोजूनमापून दिलेले अन्न लेखिकेला कमी पडत असे.

४. लेखिका दरवर्षी नापास होत असे.

**उत्तर:** १. सत्य     २. असत्य

३. सत्य     ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'पाच' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'खुशाली' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. किती पैशांच्या पोस्टकार्डावरून लेखिका भावंडांना भेटत?

२. पत्राद्वारे लेखिका काय कळवत असे?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

१. डोळा : [ ]

२. जाचक : [ ]

**उत्तर:** १. नयन २. कठोर

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. स्वस्थ × [ ]

२. प्रगती × [ ]

**उत्तर:** १. अस्वस्थ २. अधोगती

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

स्वयंपाकासाठी लागणारे धान्य ठेवण्याची जागा : [ ]

**उत्तर:** कोठीघर

**कृ.४. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. भूक, चपाती, गूळ, शेंगदाणे

२. नियम, खुशाली, कायदे, कानून

**उत्तर:** १. भूक २. खुशाली

**कृ.५. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

**१. पोटात आगडोंब उसळणे :** खूप भूक लागणे.

**वाक्य:** रस्त्यावर राहणाऱ्या राजूला दोन दिवस काहीही खाण्यास न मिळाल्याने त्याच्या पोटात **आगडोंब उसळला होता.**

**२. मुक्याने सहन करणे :** कोणताही प्रतिकार न करता सहन करणे.

**वाक्य:** इंग्रजी राजवटीत होणारे जुलूम भारतीय जनता **मुक्याने सहन करत होती.**

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. सहन : ☐ ☐

२. वर्ग : ☐ ☐

**उत्तर:** १. सहनशील, सहनशक्ती

२. वर्गपाठ, वर्गमित्र

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप शोधून लिहा.**

१. बोर्डिंग २. स्वयंपाकी

३. खिसा ४. पोट

**उत्तर:** १. बोर्डिंगा २. स्वयंपाक्या

३. खिशा ४. पोटा

**कृ.२. खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. दरवर्षी　　　　२. सुद्धा

३. पण

**उत्तर:** १. **दरवर्षी** आम्ही गणपतीसाठी गावी जातोच.

२. माझ्या मनात**सुद्धा** कोणाबद्दल वाईट विचार येत नाही.

३. रेश्मा गावात आली, **पण** आम्ही भेटलो नाही.

**कृ.३. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

दरवर्षी

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
| --- | --- | --- |
| दरवर्षी | प्रत्येक वर्षी | अव्ययीभाव समास |

**कृ.४. कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचा काळ बदला.**

१. एकमेकांची खुशाली कळवीत होतो.

**(पूर्ण भूतकाळ करा.)**

**उत्तर:** एकमेकांची खुशाली कळविली होती.

२. सगळं कसं मुक्याने सहन करत होतो.

**(साधा भविष्यकाळ करा.)**

**उत्तर:** सगळं कसं मुक्याने सहन करू.

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. वय वाढू लागलं, तसं अन्न कमी पडू लागलं.

**(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** वय वाढू लागलं, तसं अन्न पुरत नव्हतं.

२. भूक तर भागत नव्हती. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** भूक कुठे भागत होती?

**कृ.६. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. शीकण्याची धडपड, जीद्द स्वस्थ बसू देत नव्हती.

**उत्तर:** **शिकण्याची** धडपड, **जिद्द** स्वस्थ बसू देत नव्हती.

२. असेच उपाशितापाशी अर्थपोटी आपापल्या ठिकाणी आम्ही वाढत होतो.

**उत्तर:** असेच **उपाशीतापाशी, अर्धपोटी** आपापल्या ठिकाणी आम्ही वाढत होतो.

**कृ.७. वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा.**

१. पाच पैशांच्या पोस्टकार्डवरून फक्त आम्ही भेटत होतो; महिन्यातून फक्त एकदा!

**उत्तर:** (;) - अर्धविराम (!) - उद्‌गारार्थी चिन्ह

२. पोटात आगडोंब व्हायचा, मग कोठीघरातून गूळ-शेंगदाणे खावे, तर कधी स्वयंपाक्याचा डोळा चुकवून ५/१० चपात्या खिशात कोंबाव्यात.

उत्तर: (,) – स्वल्पविराम (-) – संयोगचिन्ह

(/) – विकल्प चिन्ह (.) – पूर्णविराम

**ड. माझे मत**

**कृ.१. 'काही चांगले करून दाखवण्याची जिद्द माणसाला स्वस्थ बसू देत नाही' असे तुम्हांला वाटते का?**

उत्तर: हो! नक्कीच प्रत्येकाच्या आयुष्यात एखादे असे लक्ष्य असते जे पूर्ण करण्यासाठी तो धडपडत असतो. हे लक्ष्य पूर्ण करण्याची इच्छाशक्ती जितकी प्रबळ असेल, तितक्या जास्त प्रमाणात अडचणींवर मात करण्याची सहनशक्तीही व्यक्तीमध्ये असते. आपण समोर येणाऱ्या अडचणींमुळे हतबल झालो, तरी आपल्या मनातील दृढ इच्छा, जिद्द आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. नव्या जोमाने नव्या जोशात आपण पुन्हा नव्याने सुरुवात करतो. संकटांवर मात करत प्राप्त झालेले यश हे कायमस्वरूपी साथ देते. त्या यशप्राप्तीतून मिळणारा आनंद चिरकाल टिकतो. इच्छापूर्तीची जिद्द आपल्याला यशापर्यंत नक्कीच पोहोचवते.

## परिच्छेद ३


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४५-४६ वरील (ओळ २१ ते २८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[मी खूप लांब होते ......................

...................... सोबतिणीचे काय झाले, आठवतच नाही.]

अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. आजूबाजूच्या खेड्यातील.

२. मागासवर्गीय व शिक्षणापासून वंचित.

३. काही 'घर' असलेल्या, तर काही अनाथ.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. ऑफिसचे वाया गेलेले पाठकोरे कागद.

२. जुन्या वह्यांची पाने.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. दणकट अशी पाटी चौथी ते अकरावी वापरली.

२. दर रविवारी कोळशाने घासून काळी कुळकुळीत करी.

३. पाटी झिजेपर्यंत व डुगुडुगु लागेपर्यंत वापरली.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखिकेचे छात्रालय येथे होते** → ☐

२. **लेखिकेला या इयत्तेत पाटी मिळाली** → ☐

**उत्तर:** १. कोल्हापूर २. चौथीला

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. आम्ही एका वर्गात ४/५ जणी होतो, तर ______

अ. दोघी-तिघींत लक्ष देऊन शिकत होतो.

ब. दोघी- तिघींत शिकायचा उत्साह येत नव्हता.

क. दोघी-तिघींत पुस्तकांचा एक सेट मिळायचा.

ड. सगळ्याजणी मिळून मिसळून वागत होतो.

२. त्यावर गणित - भूमिती, ______

अ. प्रमेय करून शिक्षकांना दाखवायचो.

ब. गणित सोडवून शिक्षकांना दाखवायचो.

क. लिहिण्यात सगळे पेपर संपायचे.

ड. इतिहास-भूगोलही त्यात लिहायचो.

**उत्तर:** १. आम्ही एका वर्गात ४/५ जणी होतो, तर **दोघी-तिघींत पुस्तकांचा एक सेट मिळायचा.**

२. त्यावर गणित - भूमिती, **प्रमेय करून शिक्षकांना दाखवायचो.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखिका कोल्हापुरातील छात्रालयात शिकत होती.

२. आजूबाजूच्या खेड्यांतून मागासवर्गीय आणि शिक्षणापासून वंचित असलेल्या मुली कोल्हापुरातील छात्रालयात शिकायला येत.

३. घर नसलेल्या अनाथ मुलींची संख्या ४-५ इतकी होती.

४. लेखिकेने एक दगडी पाटी चौथी ते सातवीपर्यंत जपून वापरली.

**उत्तरः** १. सत्य   २. सत्य

३. असत्य   ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'पाठकोरे' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'पाटी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तरः** १. लेखिका कोणते कागद टाचून वह्या बनवत असे?

२. लेखिकेने कोणाला आपली 'सोबतीण' म्हटले आहे?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

१. टाचून : [ ]

२. शिक्षक : [ ]

३. छात्र : [ ]

**उत्तर:** १. शिवून २. गुरू

३. विद्यार्थी

**कृ.२. खालील शब्दांचे समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लिहून कोष्टक पूर्ण करा.**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | | दणकट | |
| २. | | झीज | |

**उत्तर:**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | मजबूत | दणकट | नाजुक |
| २. | क्षय | झीज | भर |

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

विद्यार्थी / छात्र राहण्याची जागा : [ ]

**उत्तर:** छात्रालय

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

विद्यार्थी / छात्र राहण्याची जागा : [ ]

**उत्तर:** छात्रालय

**कृ.४. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

**एखाद्यावर जीव असणे** : एखाद्याबद्दल माया असणे.

**वाक्य:** विठाबाईंचा शेजारच्या चिंटूवर **खूप जीव होता.**

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दापासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

दर : [ ] [ ]

**उत्तर:** दरसाल, दरडोई

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. खालील वाक्यांतील नामे शोधून लिहा.**

१. प्रमेय करून शिक्षकांना दाखवायचो.

**उत्तर:** प्रमेय, शिक्षक

२. हळूहळू पाटी झिजली.

**उत्तर:** पाटी

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | छात्रालयात | | | |
| २. | पुस्तकांचा | | | |
| ३. | सुईदोऱ्याने | | | |
| ४. | शिक्षकांना | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | छात्रालयात | छात्रालया | त | सप्तमी |
| २. | पुस्तकांचा | पुस्तकां | चा | षष्ठी |
| ३. | सुईदोऱ्याने | सुईदोऱ्या | ने | तृतीया |
| ४. | शिक्षकांना | शिक्षकां | ना | द्वितीया/ चतुर्थी |

**कृ.३. वाक्यातील अव्यय ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

१. हळूहळू पाटी झिजली.

**उत्तर:** हळूहळू - क्रियाविशेषण अव्यय

२. शिक्षणापासून वंचित अशा पण 'घर' असलेल्या मुली यायच्या.

**उत्तर:** शिक्षणापासून - शब्दयोगी अव्यय

पण - उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खाली एका सामासिक शब्दाचा विग्रह करून देण्यात आलेला आहे. तसाच दुसरा सामासिक शब्द परिच्छेदातून शोधा व त्याचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.**

**उदा.** नीलकमल – निळे असे कमळ

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| मागासवर्ग | मागास असा वर्ग | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. मी खूप लांब होते. **(उद्गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती लांब होते मी!

२. आम्ही एका वर्गात ४/५ जणी होतो. **(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** आम्ही एका वर्गात ४/५ जणीपेक्षा जास्त नव्हतो.

**कृ.६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

हळूहळू पाटी झिजली, डुगुडुगु लागली तरी मी तशीच वापरत होते.

**उत्तर:** हळूहळू **पाट्या झिजल्या**, डुगुडुगु **लागल्या** तरी मी **तशाच** वापरत होते.

**कृ.७. खालील शब्दांचे लिंग बदला.**

१. शिक्षक २. सोबतीण

**उत्तर:** १. शिक्षिका २. सोबती

**कृ.८. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | छात्रालय | छाव्रालय | छातरालय | छात्‍रालय |
| २. | भूमीती | भूमिती | भुमिति | भुमीती |

**उत्तर:** १. छात्रालय २. भूमिती

**कृ.९. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. त्यावर गणित भूमिती प्रमेय करून शिक्षकांना दाखवायचो

**उत्तर:** त्यावर गणित-भूमिती, प्रमेय करून शिक्षकांना दाखवायचो.

२. अकरावीनंतर माझ्या या सोबतिणीचे काय झाले आठवतच नाही

**उत्तर:** अकरावीनंतर माझ्या या सोबतिणीचे काय झाले, आठवतच नाही.

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्हाला मिळालेल्या वस्तूंपैकी कोणती अशी वस्तू आहे, जी तुम्ही अगदी मनापासून जपता. थोडक्यात लिहा.**

**उत्तर:** माझ्या आजीला वेगवेगळ्या आकारांच्या बाहुल्या बनविण्याचा छंद होता. ती या बाहुल्या हाताने शिवून बनवत असे. जुन्या साड्यांचे काठ, चमकी, कपडे यांचा वापर करून आजी विविध प्रकारच्या रंगीबेरंगी बाहुल्या तयार करत असे. मी लहान असताना माझ्या पाचव्या वाढदिवसाला एक छान नवरीच्या वेशात असलेली गोड बाहुली आजीने मला भेट म्हणून दिली. बाहुलीचा सुंदर व नाजुक चेहरा आणि अंगावरची लाल साडी बघून मला ती

खूपच आवडली. ही बाहुली मी अजूनही जपून ठेवली आहे. आजीने दिलेल्या या बाहुलीशी मी आजही हितगुज करते. मनातले तिला सांगते. आज आजी हयात नाही; परंतु बाहुलीशी बोलताना मला माझ्या आजीशीच बोलण्याचा अनुभव येतो. म्हणून या बाहुलीला मी कायम मनापासून जपते व तिची काळजी घेते.

## परिच्छेद ४

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४६ वरील (ओळ २८ ते ३७) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|पुस्तकाच्या बाबतीत आम्ही दोघी-तिघींत .......................
....................... त्याची कधी खंतही वाटली नाही.|

अ. आकलन

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

**बोर्डिंगमध्ये लेखिका व त्यांच्या सोबतिणींमध्ये होणारी पुस्तकांच्या वाटणीची पद्धत**

↓

१

↓

२

↓

३

↓

४


**उत्तर:** १. दोघी-तिघींत एक पुस्तकांचा संच

२. प्रत्येकीला २/३ पुस्तके

३. लागेल तसे पुस्तक मागणे

४. अभ्यास झाल्यावर पुस्तक परत करणे

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. कु. उषा लोहिया

२. शैला शहा

३. उज्ज्वला कद्रेकर

४. माधवी जामसांडेकर

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. वह्या-पुस्तके देणाऱ्या मैत्रिणी.

२. शिक्षक

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१.
२.




**उत्तर:** १. सुपरिंटेंडेंट बाई  २. तीनच्या आत

**क्र.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. प्रत्येकजण २/३ पुस्तके आपली नावे ________

अ. न लिहिताच आपसांत वापरत होतो.

ब. लिहून स्वत:जवळ वर्षभर जपून ठेवत होतो.

क. कव्हर घालून नीट जपून वापरत होतो.

ड. न लिहिता शाळेत घेऊन जात होतो.

२. एकमेकींच्या असूयेपोटी किंवा भांडणाची ________

अ. खुमखुमी आली असेल, तर पुस्तक मिळायचेच नाही.

ब. खुमखुमी आली, तर पुस्तके फाटायची.

क. कारणे बाईंना कळली, की पुस्तके जमा करावी लागायची.

ड. खुमखुमी आली, तर पुस्तके मिळणे बंद व्हायची.

**उत्तर:** १. प्रत्येकजण २/३ पुस्तके आपली नावे, **कव्हर घालून नीट जपून वापरत होतो.**

२. एकमेकींच्या असूयेपोटी किंवा भांडणाची **खुमखुमी आली असेल, तर पुस्तक मिळायचेच नाही.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखिका स्वत:च स्वत:ची पुस्तके वापरत असे.

२. लेखिका अभ्यासात फारच हुशार होती.

३. बोर्डिंग ते शाळा हे पाच कि.मी. चे अंतर लेखिका पार करत असे.

४. पुस्तक, कंपास, पाटी-पेन्सिल या साऱ्या गोष्टी ठेवण्यासाठी लेखिकेला सुंदर दप्तर मिळाले होते.

**उत्तर:** १. असत्य २. सत्य

३. असत्य ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'पुस्तके' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'तीन' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. दोघी-तिघींत काय वाटून घेतले जात असे?

२. लेखिका वर्गात किती नंबरच्या आतच असे?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

१. भांडण : [ ]

२. असूया : [ ]

३. मैत्रीण : [ ]

४. खंत : [ ]

**उत्तर:** १. वाद  २. द्वेष

३. सखी  ४. खेद

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

पायात चप्पल न घालता : [ ]

**उत्तर:** अनवाणी

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. पुस्तक, बोर्डिंग, कंपास, पाटी

२. असूया, भांडण, मारामारी, धडगत

**उत्तर:** १. बोर्डिंग  २. धडगत

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

धडगत नसणे :

अ. आवड नसणे.

ब. योग्य नसणे.

क. वाईट स्थिती येईल अशी भीती वाटणे.

ड. वाईट स्थिती येईल अशी भीती नसणे.

**उत्तर:** वाईट स्थिती येईल अशी भीती वाटणे.

**कृ.५. परिच्छेदातील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ सांगा.**

१. कव्हर : ☐

२. सुपरिंटेंडेंट : ☐

**उत्तर:** १. वेष्टण २. अधीक्षक

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | वर्गात | अ. | चतुर्थी |
| २. | शिक्षकांना | ब. | षष्ठी |
| ३. | भांडणाची | क. | सप्तमी |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

**कृ.२. वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

१. अभ्यास झाल्यावर ते तिला परत करायचे.

**उत्तर:** झाल्यावर :- शब्दयोगी अव्यय

२. मग मार खाण्यापेक्षा, मी आपल्या वर्गमैत्रिणीकडून पुस्तक घेऊन अभ्यास करायचे.

**उत्तर:** खाण्यापेक्षा - शब्दयोगी अव्यय

वर्गमैत्रिणीकडून - शब्दयोगी अव्यय

३. हे सारे श्रेय त्या मैत्रिणींना आणि शिक्षकांना जाते.

**उत्तर:** आणि - उभयान्वयी अव्यय

४. मी अभ्यास करून वर्गात सतत तीन नंबरच्या आतच राहिले.

**उत्तर:** सतत - क्रियाविशेषण अव्यय

**कृ.३. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

धडगत

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
| --- | --- | --- |
| धडगत | धड अशी गत | कर्मधारय समास |

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. हे सारे श्रेय त्या मैत्रिणींना आणि शिक्षकांना जाते.

**(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** हे सारे श्रेय त्या मैत्रिणी आणि शिक्षकांशिवाय दुसऱ्या कोणाला जात नाही.

२. बोर्डिंग ते शाळा एक-दीड कि.मी.चे अंतर असावे.

**(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** बोर्डिंग ते शाळा हे अंतर एक-दीड कि.मी. पेक्षा कमी नसावे.

**कृ.५. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. पुस्तक, कंपास, पाटि-पेन्सिलल आडव्या हातावर धरुनच अनवाणी शाळेत जावे लागायचे.

**उत्तर:** पुस्तक, कंपास, **पाटी**-पेन्सिल आडव्या हातावर **धरूनच** अनवाणी शाळेत जावे लागायचे.

२. त्याची कधि खतंही वाटली नाही.

**उत्तर:** त्याची **कधी खंतही** वाटली नाही.

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. प्रत्येकजण २ ३ पुस्तके आपली नावे कव्हर घालून नीट जपून वापरत होतो

**उत्तर:** प्रत्येकजण २/३ पुस्तके आपली नावे, कव्हर घालून नीट जपून वापरत होतो.

२. बोर्डिंग ते शाळा एक दीड कि मी चे अंतर असावे

**उत्तर:** बोर्डिंग ते शाळा एक-दीड कि.मी. चे अंतर असावे.

ड. माझे मत

**कृ.१. तुम्ही मित्रमैत्रिणींशी वस्तूंची वाटणी करून अभ्यास करता का? तुमचा अनुभव सांगा.**

उत्तर: शाळा म्हणजे एक छोटा समाज असतो. त्यानुसार आमच्या वर्गातही वस्तूंची देवाण-घेवाण चालूच असते. बऱ्याचदा शैक्षणिक साहित्याची देवाण-घेवाण होते. विज्ञान, भूगोल असे प्रात्यक्षिकांवर आधारित विषय शिकताना शाळेकडून पुरविण्यात येणारी प्रायोगिक साधने ही मर्यादित असतात. तेव्हा गटागटांमधून या साधनांचा वापर करतो. सर्वांत जास्त मजा तेव्हा येते; जेव्हा 'प्रकल्प' तयार करण्यास सांगितले जातात. त्यावेळी गट बनविले जातात आणि प्रकल्पनिर्मिती करून सादरीकरण केले जाते. त्यावेळी एकमेकांच्या मदतीने, साधनांच्या वाटणीतून सर्व कामे केली जातात. त्यातूनच आम्हा विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता, नेतृत्वगुण व बंधुभाव या मूल्यांचेही मापन केले जाते. या निमित्ताने आम्हालाही या मूल्यांचे महत्त्व समजते.

## परिच्छेद ५


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४६ वरील (ओळ ३७ ते ५१) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|मला पहिली चप्पल मिळाली ......................

...................... कोणाच्या दयेतून मिळालेले नव्हते.|

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तरः १. नवव्या वर्गात असताना पहिली चप्पल मिळाली.

२. वडिलांनी दिलेल्या ५ रुपयांतून घेतली.

३. हवाई चप्पल (स्लिपर)

कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. चप्पल मळू नये, झिजू नये म्हणून लेखिका हलकेच चालत.

२. मातीतील चपलेचा ठसा बघताना आनंदी होत.

३. बोर्डिंगमध्ये परतल्यावर चप्पल पुन्हा धुऊनपुसून कागदात गुंडाळून ठेवत.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. एका रंगाचे

२. जाड्याभरड्या कापडाचे

३. ढगळ शिवलेले

**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| (१) ← | **रस्त्यातील लोकांनी वसतिगृहातील मुलींकडे टकामका बघण्याची कारणे** | → (२) |

**उत्तर:** १. त्यांना त्या सर्कसमधले प्राणी वाटत.

२. तुरुंगातले एकसारखे कपडे घातलेले कैदी वाटत.

**कृ.५. ओघतक्ता पूर्ण करा.**

**लेखिकेला 'स्व' ची जाणीव झाल्यावर त्यांच्यात झालेला बदल**

↓

१

↓

२

**उत्तर:** १. दयेतून मिळालेले कपडे वापरणे बंद झाले.

२. बोर्डिंगच्या कपड्यांमध्ये कमीपणा वाटेनासा झाला.

**कृ.६. चौकट पूर्ण करा.**

१. **लेखिकेची चप्पल तिच्या पायांचे यापासून रक्षण करत होती** → [ ]

२. **कळत नव्हतं तेव्हा लेखिकेला याची अपूर्वाई वाटत असे** → [ ]

**उत्तर:** १. उन्हातान्हापासून

२. श्रीमंत स्त्रियांनी दिलेले कपडे

**कृ.७. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. बोर्डिंगवर आले, की चप्पल ________

अ. लपवून ठेवायचे.

ब. धुऊनपुसून पुन्हा कागदाच्या खपटात जपून ठेवायची.

क. कुठल्यातरी कोपऱ्यात फेकून द्यायची.

ड. ज्या मैत्रिणीला लागेल तिला घालायला द्यायची.

२. काही वेळा छात्रालयाला श्रीमंत स्त्रिया भेट देत, तेव्हा ________

अ. आम्ही मुली खूपच आनंदी व्हायचो.

ब. आम्हांला पुस्तके मिळावी असे वाटायचे.

क. त्या बायकांचा हेवा वाटत असे.

ड. येताना आमच्यासाठी कपडे घेऊन यायच्या.

उत्तर: १. बोर्डिंगवर आले, की चप्पल **धुऊनपुसून पुन्हा कागदाच्या खपटात जपून ठेवायची.**

२. काही वेळा छात्रालयाला श्रीमंत स्त्रिया भेट देत, तेव्हा **येताना आमच्यासाठी कपडे घेऊन यायच्या.**

**कृ.८. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. इयत्ता नववीत लेखिकेला पहिली चप्पल मिळाली.

२. चालताना चप्पल मळू नये म्हणून लेखिका फार जपत नसे.

३. लेखिका व वसतिगृहातील तिच्या इतर मैत्रिणी अंगावर श्रीमंती कपडे मिरवायच्या.

४. 'स्व' ची जाणीव झाल्यावर बोर्डिंगचे जाडेभरडे कपडे घालण्यात लेखिकेला कमीपणा वाटायचा.

उत्तर: १. सत्य २. असत्य

३. असत्य ४. असत्य

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

१. लाज :

२. आत्मसन्मान :

३. कारागृह :

**उत्तर:** १. संकोच २. स्व

३. तुरुंग

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. हलके ×

२. अर्धा ×

३. श्रीमंत ×

४. ढगळ ×

**उत्तर:** १. जड २. पूर्ण

३. गरीब ४. घट्ट

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

तापलेली बारीक वाळू किंवा माती :

**उत्तर:** फुफाटा

**कृ.४. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. सर्कस : प्राणी : : तुरुंग :

२. लहान : वय : : ढगळ :

**उत्तर:** १. कैदी २. कपडे

**कृ.५. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

१. पेटीचे धन होणे :

अ. सोन्याची पेटी असणे.

ब. खजिना सापडणे.

क. पेटीतच पडून राहणे.

ड. पेटी सापडणे.

२. टकामका बघणे :

अ. रागात बघणे.

ब. डोळे विस्फारून बघत राहणे.

क. चोरून बघणे.

ड. रडत-रडत बघणे.

**उत्तर:** १. पेटीतच पडून राहणे.

२. डोळे विस्फारून बघत राहणे.

क्र.६. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.

चालताना

१ | २ | ३ | ४ | ५

**उत्तर:** चाल, ताल, नाल, लता, ताना

क्र.७. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.

विचारताय

विचार | चार | तारा | तार

**उत्तर:** तारा

क्र.८. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.

१. धन : ☐ ☐

२. स्व : ☐ ☐

३. रंग : ☐ ☐

**उत्तर:** १. धनवान, धनलाभ   २. स्वमत, स्वतंत्र

३. रंगमंच, रंगभूषा

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.

(चप्पल, चालायचे, आपण, श्रीमंत, जाडे-भरडे, वय, बघायचे, त्या)

उत्तर:

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| चप्पल, वय | आपण, त्या | श्रीमंत, जाडे-भरडे | चालायचे, बघायचे |

कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | वडिलांनी | | | |
| २. | फुफाट्यात | | | |
| ३. | कापडाचे | | | |
| ४. | प्राणी | | | |

उत्तर:

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | वडिलांनी | वडिलां | नी | तृतीया |
| २. | फुफाट्यात | फुफाट्या | त | सप्तमी |
| ३. | कापडाचे | कापडा | चे | षष्ठी |
| ४. | प्राणी | प्राणी | - | प्रथमा |

**कृ.३. खालील अव्यये आणि अव्यय प्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | अव्यय | | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | व्वा | अ. | उभयान्वयी अव्यय |
| २. | पर्यंत | ब. | केवलप्रयोगी अव्यय |
| ३. | की | क. | क्रियाविशेषण अव्यय |
| ४. | टकामका | ड. | शब्दयोगी अव्यय |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ) (४ - क)

**कृ.४. वाक्याचा प्रकार ओळखा.**

**(विधानार्थी, उद्‌गारार्थी, नकारार्थी)**

१. माझ्या वडिलांनी ५ रुपये दिले होते.

**उत्तर:** विधानार्थी वाक्य

२. पण त्या लहान वयात काही वाटायचे नाही.

**उत्तर:** नकारार्थी वाक्य

**कृ.५. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. माझ्या वडीलांनी ५ रूपये दिले होते.

**उत्तर:** माझ्या **वडिलांनी** ५ **रुपये** दिले होते.

२. कळत नव्हतं तोवर त्याची अपुर्वाइ वाटायचि.

**उत्तर:** कळत नव्हतं तोवर त्याची **अपुर्वाई वाटायची.**

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

त्यांना आम्ही सर्कसमधले प्राणी वाटायचो की तुरुंगातले एकसारखे कपडे घातलेले कैदी

**उत्तर:** त्यांना आम्ही सर्कसमधले प्राणी वाटायचो, की तुरुंगातले एकसारखे कपडे घातलेले कैदी?

**ड. माझे मत**

**क्र.१. आयुष्यात खूप अपेक्षेनंतर एखादी वस्तू मिळाल्यास तिचे मोल जास्त जाणवते, असे तुम्हाला वाटते का?**

**उत्तर:** हो! आपण प्रत्येकजण काहीनाकाही वस्तूंची अपेक्षा करत असतो. ज्या वस्तू सहजतेने मिळतात, त्यांची किंमत आपल्याला नसते. जसे, 'जेथे पिकते तेथे खपत नाही,' जेथे जे मुबलक असते, तेथे त्या वस्तूला मूल्य राहत नाही, त्याचप्रमाणे आपल्याला सहजप्राप्य वस्तूंची ओढ कमी असते. हा नियम केवळ वस्तूंच्या बाबतीतच लागू पडतो असे नाही, तर व्यक्ती, संधी, पदार्थ, इच्छा यांच्याही बाबतीत लागू पडतो. ज्या मुलांना आईवडिलांचे प्रेम मिळालेले नसते, तेच प्रेम ते अन्य नात्यांमध्ये शोधतात आणि तशीच प्रेमाची सावली लाभल्यास त्याची कदरही करतात. एखादी संधी असो, एखादा पदार्थ असो किंवा एखादी दृढ इच्छा असो त्यांची पूर्ती करण्यासाठी जर खूप झटावे लागले, तर ते हातात येताच होणारा आनंद हा अधिकच असतो. म्हणूनच आपल्याला जे मिळाले आहे त्याची जपणूक करावी व जे हवे आहे ते मिळवण्यासाठी इष्ट प्रयत्न करावेत असे मला वाटते.

## परिच्छेद ६

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४६-४७ वरील (ओळ ५९ ते ६८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|मॅट्रिकला असताना खूप ......................

...................... निकाल १०० टक्के लागला.|

### अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.

(१) ← शनिवारी छात्रालयात मिळणारा नाश्ता → (२)

**उत्तर:** १. पावडरच्या दुधाचा चहा.

२. एक मोठा बनपाव.

**कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.**

**छात्रालयातील मुलींचा शनिवारचा दिनक्रम**

↓

१

↓

२

↓

३

↓

४

**उत्तर:** १. सकाळी नाश्ता करणे.

२. त्यानंतर शाळेत जाणे.

३. दुपारी १२.३० / १ ला जेवण.

४. सायंकाळी ७ ला जेवण.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **छात्रालयात या दिवशी चहा मिळायचा** → [ ]

२. **बोर्डिंगचा मॅट्रिकचा निकाल** → [ ]

**उत्तर:** १. शनिवारी २. १०० टक्के

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. पण त्या दिवशी आम्हाला झोप का येत नाही... ________

अ. संशोधन केले. ब. विचार केला.

क. अभ्यास केला. ड. मनन केले.

२. जेणेकरून आम्ही खूप खूप अभ्यास करू नि ________

अ. खूप चांगल्या पास होऊन दाखवू.

ब. खूप चांगली नोकरी करू.

क. आपले भविष्य घडवू.

ड. खूप कामही करू.

**उत्तर:** १. पण त्या दिवशी आम्हाला झोप का येत नाही... **संशोधन केले.**

२. जेणेकरून आम्ही खूप खूप अभ्यास करू नि **खूप चांगल्या पास होऊन दाखवू.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. मॅट्रिकला असताना लेखिकेने अभ्यासाचे दडपण फार मनावर घेतले नव्हते.

२. लेखिकाच्या अकरावीच्या वर्गात बारा जणी शिकत होत्या.

३. सर्व मुलींच्या विनंतीवरून सायंकाळी त्या सर्वजणींना अर्धा फुलपात्र चहा मिळू लागला.

४. बोर्डिंगचा निकाल १०० टक्के लागला होता.

**उत्तर:** १. असत्य　　२. असत्य

३. असत्य　　४. सत्य

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**क्र.१. खालील शब्दांसाठी परिच्छेदात आलेले इंग्रजी शब्द सांगा.**

१. छात्रालय → [ ]　　२. अभ्यासक्रम → [ ]

**उत्तर:** १. बोर्डिंग　　२. पोर्शन

**कृ.२. खालील शब्दांचे समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लिहून कोष्टक पूर्ण करा.**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | | अर्धा | |
| २. | | शेवट | |

**उत्तर:**

| | समानार्थी | शब्द | विरुद्धार्थी |
|---|---|---|---|
| १. | निम्मा | अर्धा | पूर्ण |
| २. | अंत | शेवट | सुरुवात |

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. परीक्षा, निकाल, पास, झोप

२. महिना, सकाळी, दुपारी, सायंकाळी

**उत्तर:** १. झोप २. महिना

**कृ.४. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**


१. बन [ ] शेर

२. ग्लास [ ] पेट

**उत्तर:** १. बनपाव, पावशेर २. ग्लासभर, भरपेट


क्र.५. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.

१.




उत्तर: बाप

२.




उत्तर: संधान

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या जोड्या जुळवा.**

| | विशेषणे | | विशेष्ये |
|---|---|---|---|
| १. | जादा | अ. | चहा |
| २. | ग्लासभर | ब. | बनपाव |
| ३. | मोठा | क. | फुलपात्र |
| ४. | अर्धा | ड. | तास |

**उत्तर:** (१ - ड), (२ - अ), (३ - ब), (४ - क)

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | दुधाचा | | | |
| २. | आम्हाला | | | |
| ३. | छात्रालयात | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | दुधाचा | दुधा | चा | षष्ठी |
| २. | आम्हाला | आम्हा | ला | द्वितीया/चतुर्थी |
| ३. | छात्रालयात | छात्रालया | त | सप्तमी |

**कृ.३. खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. सकाळी २. मुळे

उत्तर: १. सकाळी : मी रोज **सकाळी** योगासने करतो.

२. मुळे : पावसा**मुळे** वातावरणात गारवा जाणवत होता.

**कृ.४. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**

१. पण आम्हाला शेवटपर्यंत एकही दिवस चहा मिळाला नाही.

**उत्तर:** नकारार्थी वाक्य

२. बोर्डिंगचा मॅट्रिकचा निकाल १०० टक्के लागला.

**उत्तर:** विधानार्थी वाक्य

**कृ.५. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. मॅट्रीक | म्रॅटिक | मॅठ्रीक | मॅट्रिक

२. संषोधन | सशोंधन | संशोधन | सशोधंन

**उत्तर:** १. मॅट्रिक २. संशोधन

कृ.६. विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा.

| | विरामचिन्हे | | नावे |
|---|---|---|---|
| १. | ? | अ. | अर्धविराम |
| २. | ! | ब. | स्वल्पविराम |
| ३. | / | क. | पूर्णविराम |
| ४. | . | ड. | प्रश्नचिन्ह |
| ५. | ; | इ. | विकल्पचिन्ह |
| ६. | , | ई. | उद्‌गारचिन्ह |

**उत्तर:** (१ - ड), (२ - ई), (३ - इ), (४ - क), (५ - अ), (६ - ब)

## ड. माझे मत

**कृ.१. अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासाठी व टिकविण्यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न करता?**

**उत्तर:** अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासाठी मी जास्तीत जास्त अभ्यास पहाटेच्या वेळेस करते; रात्रीच्या झोपेनंतर शरीर-मन ताजंतवानं झालेलं असतं. नव्याने दिवस सुरू होतो, तेव्हा मेंदूची आकलनक्षमता अधिक असते. शिवाय माणसांची वर्दळ, गडबड-गोंधळ कमी असते. त्यामुळे मन चांगले एकाग्र होते. अभ्यास सुरू करण्यापूर्वी मी प्राणायाम अवश्य करते. यामुळे मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो. त्यानेही मेंदूची कार्यक्षमता वाढते. रात्री मी वेळेत झोपते. जागरणाने मेंदू अधिक थकतो, त्यामुळे मी जागरण टाळते. मनाच्या एकाग्रतेचे हे सर्व मार्ग अवलंबल्यास उत्तमच, पण मुख्य मार्ग म्हणजे दृढ निश्चय. अभ्यास, आपले ध्येय, ते गाठण्याची ईर्ष्या नसेल, दृढ निश्चय नसेल, तर वर उल्लेखलेले सर्व उपाय निरर्थक ठरतात.


## परिच्छेद ७

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४६-४७ वरील (ओळ ५९ ते ६८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[अकरावीनंतर औरंगाबादला कॉलेजात नाव ....................
.................... मीच माझ्यात स्वत: बदल घडवून आणले.]

अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**



**उत्तर:** १. व्यवस्थित  २. कडक इस्त्रीचा

३. खाकी

**कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.**

**N.C.C. मध्ये प्रवेश केल्यानंतर लेखिकेची झालेली प्रगती**

↓

१

↓

२

↓

३

↓

४

**उत्तर:** १. रुबाबदारपणा वाढला.

२. अंडर ऑफिसरपर्यंत प्रगती झाली.

३. दिल्लीला 'प्रजासत्ताकदिना'च्या परेडसाठी निवड झाली.

४. निडर झाल्या.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. **कॉलेजमध्ये लेखिकेने मनाचा हिय्या करून यामध्ये भाग घेतला** → [ ]

२. **सार्जंटनंतर लेखिकेला हे पद मिळाले** → [ ]

**उत्तर:** १. N.C.C. मध्ये

२. Under Officer (अंडर ऑफिसर)

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. N.C.C. चा युनिफॉर्म घातला, की कुठून कशी माहीत नाही; पण ______

अ. मला भीतीच वाटायची.

ब. माझ्यात उत्साहाची लाटच उसळायची.

क. अंगात 'वीरश्री' संचारायची.

ड. अंगातली शक्ती जागायची.

२. दोन वर्षांत दिल्लीला ______

अ. जाण्याची संधी मी चुकवली.

ब. जाण्याची माझी इच्छा जागृत झाली.

क. 'स्वातंत्र्यदिना'च्या झेंडावंदनास जाण्याची संधी मिळाली.

ड. 'प्रजासत्ताकदिना'च्या परेडसाठी निवड झाली.

उत्तर: १. N.C.C. चा युनिफॉर्म घातला, की कुठून कशी माहीत नाही; पण **अंगात 'वीरश्री' संचारायची.**

२. दोन वर्षांत दिल्लीला **'प्रजासत्ताकदिना'च्या परेड्साठी निवड झाली.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. अकरावीनंतर लेखिकेने औरंगाबाद येथील कॉलेजात प्रवेश घेतला.

२. N.C.C. चा गणवेश घातल्यानंतर लेखिकेच्या अंगात बळ संचारत असे.

३. लेखिकेला Under officer पदावरून 'सार्जंट' पदावर बढती मिळाली.

४. प्रजासत्ताकदिनाच्या परेडसाठी लेखिकेची निवड होऊ शकली नाही.

**उत्तर:** १. सत्य   २. सत्य

३. असत्य   ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'औरंगाबाद' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'रुबाबदारपणा' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. अकरावीनंतर लेखिकेने कोणत्या शहरातील कॉलेजात नाव घातले?

२. N.C.C. चा खाकी युनिफॉर्म काय वाढवायचा?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**